MHNS190002662017

| | | |
|---|---|---|
| खटला दाखल दिनांक | – | १७.०२.२०१७ |
| खटला नोंदणी दिनांक | – | १७.०२.२०१७ |
| खटला निकाल दिनांक | – | ३०.०७.२०२६ |
| निकालाची अवधी | – | व. म. दि.<br>०९ ०५ १३ |

<table>
<tr><td></td><td><u>येवला येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात</u><br>(पिठासिन अधिकारी डी. एम. गुलाटी)<br>नियमित फौजदारी खटला क्र.७७/२०१७ नि.क्र.३७</td></tr>
<tr><td></td><td>(प्रथम खबर I-१६६/२०१६, भा.द.वि कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे</td></tr>
<tr><td>फिर्यादी</td><td>महाराष्ट्र शासन,<br>मार्फतः ठाणे अंमलदार,<br>येवला तालुका पोलीस स्टेशन, येवला,<br>जि. नाशिक.</td></tr>
<tr><td>तर्फे</td><td>विव्दान विधिज्ञ श्री. एस.एस.भाटे.</td></tr>
<tr><td>आरोपी</td><td>अनिल अंबादास शिंदे,<br>वय – २५ वर्षे,<br>रा. जळगाव नेउर, ता. येवला,<br>जि. नाशिक.</td></tr>
<tr><td>तर्फे</td><td>विव्दान विधिज्ञ श्री. आर.डब्ल्यु.गायकवाड.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| घटना घडल्याची तारीख | : | २८.११.२०१६ |
| प्रथम खबर दिनांक | : | ३०.११.२०१६ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची दिनांक | : | १७.०२.२०१७ |
| न्यायालयाने दोषारोप निश्चित केल्याची दिनांक | : | ०१.०३.२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याची दिनांक | : | ०१.०३.२०२१ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची दिनांक | : | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | : | ३०.०७.२०२६ |

**<u>आरोपींचा तपशील</u>**

| अ. | आरोपीचे | अटक केल्याची | जामिनावर | गुन्हया | आरोपी | देण्या | फौ.प्र.सं. |
|---|---|---|---|---|---|---|---|

| क्र. | नाव | दिनांक | मुक्तता केल्याची तारीख | ची कलमे | स शिक्षा करण्या त आली किंवा निर्दोष ठरविण्य ात आले | त आले ली शिक्षा | कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान आरोपीने कारागृहात घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **अनिल अंबादास शिंदे** | ०२.११.२०१६ | २६.१२.२०२२ | भा.द. वि चे कलम ३२५, ३२३, ५०४ , ५०६ प्रमाणे | निर्दोष | --- | --- |

## अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार –

| **क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| १. | पोपट बाळाजी शिंदे | ३२ | फिर्यादी |
| २. | शांताराम पोपट शिंदे | ३३ | साक्षीदार |

## ब) बचाव पक्षाचे साक्षीदार –

| **क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| | | निरंक | |

## क) न्यायालयीन साक्षीदार –

| **क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| | | निरंक | |

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन कागदपत्रांची यादी व निशाण्या

**अ) अभियोगपक्ष –**

| **क्र.** | **दस्तऐवजाचा तपशिल** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| १. | फिर्याद | निरंक |
| २. | घटनास्थळ पंचनामा | ३४ |
| ३. | वैदयकीय प्रमाणपत्र | ३५ ते ३५अ |

**ब) बचावपक्ष –**

| **क्र.** | **दस्तऐवजाचा तपशिल** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| | निरंक | |

**क) न्यायालयीन दस्तऐवज –**

| **क्र.** | **दस्तऐवजाचा तपशिल** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| | निरंक | |

**ड) जप्त मुद्देमाल –**

| **क्र.** | **वस्तुंचा तपशिल** | **आर्टीकल क्र.** |
|---|---|---|
| १ | निरंक | |

## <u>न्यायनिर्णय</u>

## (निकाल तारीख ३० जुलै, २०२६)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान चे कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले आहेत.

**<u>अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे आहे</u>–**

२. घटना ही दि.२८/११/२०१६ रोजी सायंकाळी ०५:०० ते ०५:३० वाजेच्या सुमारास घडली. त्यावेळी फिर्यादी पोपट बाळाजी शिंदे व त्यांचा मुलगा शांताराम पोपट शिंदे असे दोघेजन त्यांचे शेताचे बांधाजवळ बसलेले असताना त्यांच्या शेताचे बांधास बांध लागुन असलेला आरोपी अनिल अंबादास

शिंदे हा त्यांचे जवळ आला व तो दारु पिलेला होता. आरोपीने त्याचे व फिर्यादीच्या मागील भांडणाची कुरापत काढुन त्यांना व त्यांचा मुलगा शांताराम पोपट शिंदे यांना शिवीगाळ करु लागला व त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करु लागला. त्यावेळी त्यांचा मुलगा त्यांना सोडविण्यासाठी आला असता आरोपीने त्यांच्या डावे हाताच्या मनघटावर, डावे हाताचे पंजावर, उजवे हाताचे मनगटावर तोंडाने जोरात चावा घेतला. त्यानंतर फिर्यादीने आरोपीच्या हातुन त्यांची सोडवणुक करुन घेतली. त्यावेळी त्यांच्या मुलाला डावे हाताचे करंगळीला व हाताचे मधले बोटाला आरोपीने चावा घेतला. त्यावेळी जवळच असलेला फिर्यादीचा पुतण्या दत्तु रघुनाथ शिंदे व बाळनाथ रघुनाथ शिंदे अशांनी त्यांची सोडवासोडव केली. त्यावेळी आरोपी अनिल अंबादास शिंदे त्यांना शिवीगाळ करुन म्हणाला की, तुझी आई भुताळीन आहे, असे म्हणुन मारुन टाकण्याचा दम दिला. म्हणुन फिर्यादीने आरोपीविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली.

३. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने येवला तालुका पोलीस स्टेशन, येवला, ता. येवला, जि. नाशिक येथे गु.र.नं.I–१६६/२०१६, भा.द.वि कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हयाची आरोपीं विरुध्द नोंद झाली. तपासिक अंमलदार आर.टी.तांदळकर, यांनी त्यांचे तपासाअंती आरोपीं विरुध्द पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले.

४. दोषारोपपत्राचे तथा दस्तऐवजाचे अवलोकन करुन नि.क्र. १२ अन्वये आरोपीविरुध्द कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे दोषारोप निश्चित केला, ज्याअर्थी आरोपीने गुन्हयास नाकबुली नि.क्र. १३ अन्वये दर्शविली व संपरिक्षेची मागणी केली.

५. आरोपीं विरुध्द गुन्हयात गोवणारा पुरावा नसल्याने त्याचे कलम ३१३(१)(ब) फौजदारी प्रक्रिया संहिता प्रमाणेचे बयान वगळण्यात आले.

६. अभियोगपक्ष व आरोपीपक्षाचा युक्तीवाद ऐकला व अभिलेखाचे

अवलोकन केले असता, न्यायनिर्णयाकरिता खालील मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | दिनांक २७.०९.२०१६ रोजी दुपारी ०१.०० वाजेच्या सुमारास परदेशपुरा, ता. येवला, जि. नाशिक येथे आरोपीने फिर्यादी व साक्षीदारास चावा घेवुन इच्छापुर्वक गंभीर दुखापत पोहचवली व त्यायोगे भा.द.वी कलम ३२५ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ०२. | वरील तारखेस, वेळी, ठिकाणी आरोपीने फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन दुखापत केल्याचे व त्यायोगे भा.द.वी कलम ३२३ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ०३. | वरील तारखेस, वेळी, ठिकाणी आरोपीने फिर्यादी व साक्षीदारास शिवीगाळ करुन अपमानीत केल्याचे व दुसरा गुन्हा करण्याकरीता अथवा सार्वजनीक शांतता भंग होणे करीता त्यांना प्रक्षोभित केल्याचे आणि त्यायोगे भा.द.वी कलम ५०४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ०४. | वरील तारखेस, वेळी, ठिकाणी आरोपीने फिर्यादी व साक्षीदारास जिवे मारण्याची धमकी दिल्याचे व त्यायोगे भा.द.वी कलम ५०६ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही.** |
| ०५. | आदेश काय? | **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## – <u>का र ण मि मां सा</u> –

**<u>मुद्दा क्र. १ ते ५ करीता</u> :–**

७. मुद्दा क्र.१ ते ५ हे एकमेकांशी संलग्नीत असल्याने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांना एकत्र चर्चेस घेत आहे. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप शाबीत करण्याकरीता फिर्यादी पोपट बाळाजी शिंदे (सा.क्र.१) यास तपासले. पोपट बाळाजी शिंदे (सा.क्र.१) याने त्याच्या साक्षीत असे सांगितले की, ते आरोपीला ओळखता. ते त्यांचे शेजारी आहे. घटना कधी, कुठे व केव्हा घडली, याबाबत त्यांना काही आठवत नाही. असे घडले नाही की, त्यांना व त्यांच्या मुलाला आरोपींनी मारहाण केली होती. त्यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती. त्यांनी फिर्यादीवरील त्यांची सही ओळखली व त्यातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे सांगितले.

८. शांताराम पोपट शिंदे (सा.क्र.२) यांनी त्यांच्या साक्षीत सांगितले की, ते आरोपीला ओळखता. ते त्यांचे शेजारी आहे. घटना कधी, कुठे व केव्हा घडली, याबाबत त्यांना काही आठवत नाही. असे घडले नाही की, त्यांना व त्यांच्या वडीलांना आरोपींनी मारहाण केली होती.

९. या प्रकरणात अभियोग पक्षाने दोन साक्षीदार तपासले आहे. पोपट बाळाजी शिंदे (सा.क्र.१) हे फिर्यादी आहे व शांताराम पोपट शिंदे (सा.क्र.२) हे साक्षीदार आहे. पोपट बाळाजी शिंदे (सा.क्र.१) व शांताराम पोपट शिंदे (सा.क्र.२) यांनी त्यांच्या साक्षीत असे सांगितले आहे की, घटना कधी, कुठे व केव्हा घडली, याबाबत त्यांना काही आठवत नाही. साक्षीदारांनी त्यांच्या साक्षीमध्ये घटनेच्या दिवशी आरोपींने मागील भांडणाच्या कारणावरुन कुरापत काढुन शिवीगाळ केली व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी शांताराम पोपट शिंदे (सा.क्र.२) हा सोडविण्यासाठी आला असता आरोपीने त्याच्या डावे हाताच्या मनगटावर, डाव्या हाताच्या पंजावर, उजव्या हाताच्या मनगटावर चावा घेतला. फिर्यादीने आरोपीच्या हातुन त्यांची सोडवणुक केली असता त्यावेळी आरोपीने शांताराम पोपट शिंदे (सा.क्र.२) याच्या हातावर पुन्हा चावा घेतला, याबाबत काही सांगितले नाही.

म्हणुन घटनेच्या दिवशी आरोपीने फिर्यादी व साक्षीदाराला शिवीगाळ व दमदाटी करुन मारहाण केली व त्यांच्या हातावर चावा घेतला याबाबत शंका निर्माण होते. म्हणुन आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे. म्हणुन मी **मुददा क्र.१ ते ४** चे उत्तर नकारार्थी नोंदविते व **मुददा क्र. ५** करीता खालील आदेश पारित करते.

## आदेश

१. **आरोपी अनिल अंबादास शिंदे** यांना भारतीय दंड विधान, १८६० मधील कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ नुसार जामीन ची पुर्तता करावी.

३. आरोपीचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात यावे.

DEEPIKAKAUR MANMOHANSINGH GULATI
Digitally signed by DEEPIKAKAUR MANMOHANSINGH GULATI
Date: 2026.07.30 13:22:58 +0530

**स्थळ :– येवला.**
**दिनांक :–३०.०७.२०२६.**

**(डी.एम.गुलाटी)**
**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, येवला**
**जि. नाशिक.**